


# पारनेर दर्शन




वर्ष १ अंक २५०, शुक्रवार २१ जुन २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# विखे पाटील पराभव मान्य करा!

## ■ खा.नीलेश लंके यांचा माध्यमांशी संवाद ■ ईव्हीएम, व्हीव्हीपॅटच्या चौकशीची मागणी चुकीची

हंगे : विशेष प्रतिनिधी

**ईव्हीएम मशिन तसेचव्हीव्हीपॅटवर संशय घेत त्याच्या चौकशीची भाजपाचे पराभूत उमेदवार मा. खा. डॉ. सुजय विखे यांनी निवडणूक आयोगाकडे केलेली मागणी चुकीची असल्याचे सांगत महाविकास आघाडीचे खासदार नीलेश लंके यांनी विखे यांनी ईव्हीएमवर खापर न फोडता पराभव मान्य करा असा सल्ला त्यांना दिला आहे.**

मा. खा. डॉ. सुजय विखे यांनी ईव्हीएम मशिन तसेच व्हीव्हीपॅटवर संशय घेत श्रीगोंदे येथील १०, पारनेर १०, नगर ५, शेवगांव-पाथर्डी ५, कर्जत-जामखेड ५ व राहुरी येथील ५ मतदार ईव्हीएम व व्हीव्हीपॅटची पडताळणी करण्याची मागणी निवडणूक आयोगाकडे केली आहे. डॉ. विखे यांच्या या मागणीनंतर खा. नीलेश लंके यांनी पराभवाचे खापर ईव्हीएमवर न फोडता पराभव मान्य करा असा सल्ला हंगे येथे गुरूवारी माध्यमांशी बोलताना दिला.

यावेळी बोलताना लंके म्हणाले, माझ्या राजकीय जीवनात मी अनेक निवडणूका पाहिल्या. मी जिल्हा, राज्य व केंद्रस्तरीय निवडणूका हाताळल्या असून त्या पारदर्शीपणे पार पडल्याचा माझा अनुभव आहे. नगर लोकसभा मतदारसंघाचा विचार केला तर राज्यात सर्वात उशिरा या मतदारसंघाचा निकाल जाहिर झाला. प्रत्येक गोष्ट चार-चार वेळा प्रत्येक अधिकाऱ्याने नजरेखालून घातली. चार-चार वेळा प्रत्येक आकडे तपासण्यात आले. प्रत्येक विधानसभा मतदारसंघातील पाच-पाच व्हिव्हिपॅड मशिन मधील चिठठया मोजण्यात आल्या. त्यात कोठेही फरक आढळून आलेला नाही. त्यामुळे भाजपाचे पराभूत उमेदवार डॉ. सुजय विखे यांनी केलेली मागणी चुकीची असल्याचे लंके यांनी सांगितले.



### समाजाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न

मला कालच समजले की माझ्या ज्या प्रचार सभा झाल्या, त्याच्या व्हिडीओ चित्रीकरणाची मागणी करण्यात आली आहे. तुम्ही पराभव मान्य करायला शिका. समाजापुढे जाताना समाजाला सांगू शकत नाहीत की मी माझ्या कर्तुत्वामुळे पराभूत झालो. ईव्हिएमध्ये घोटाळा झाल्याचे सांगून समाजाची दिशाभुल करण्याचा हा प्रयत्न आहे. व्हीव्हीपॅडमध्ये घोटाळा झाला, अधिकाऱ्यांनी सहकार्य केले नाही, हे करण्यापेक्षा त्यांनी पराभव मान्य करायला शिकले पाहिजे असा सल्ला लंके यांनी दिला.

### विजय, पराभव पचविता आला पाहिजे

डॉ. विखे यांच्या मागणीचा दुसऱ्या बाजूने विचार केला तर त्यांना त्यांचा पराभवच मान्य नाही असा त्याचा अर्थ होतो. निवडणूकीत ज्यावेळी सत्तांतर होते, त्यावेळी विजयी झाल्यानंतर विजयाचा आनंद पचविता आला पाहिजे, आणि पराभवही पचविता आला पाहिजे असे लंके म्हणाले.

### विखे कुटूंबाची ही परंपरा !

विखे कुटूंबाची ही राजकीय परंपरा आहे. डॉ. विखे यांच आजोबा स्व. बाळासाहेब विखे हे यशवंतराव गडाख यांच्याकडून पराभूत झाले त्यावेळीही निवडणूक आयोगाकडे जाऊन, तत्कालीन निवडणूक आयुक्त टी.एन. शेषण यांनी भेट घेऊन त्यांनी आक्षेप नोंदविला होता याची आठवणीही खा. लंके यांनी करून दिली.

### मला मतदारसंघात कटूता ठेवायची नाही

परवा केडगांव येथे झालेल्या सभेमध्ये तुम्ही विखे परिवारावर स्तुती सुमने उधळली या प्रश्नावर बोलताना निवडणूका झाल्यानंतर कधीही व्यक्तीव्देशातून वागायचे नसते. बऱ्याच राजकीय मंडळींना त्याचे भान नसते. सत्तेत आल्यानंतर कोण विरोधात आहे ? त्याची कशी जिरवता येईल ? त्याला कसा त्रास देता येईल हा प्रकार होत असतो. मी सरळ मार्गाने राजकारण करणारा, राजमार्गाने काम करणारा कार्यकर्ता आहे. राजकारणाची खुर्ची, सत्ता ही जिरवाजिरवी करण्यासाठी, त्रास देण्यासाठी नसते. सत्तेचा फायदा सर्वसामान्य जनतेसाठी झाला पाहिजे. मतदारसंघात अनेक प्रलंबित प्रश्न आहेत. ते मार्गी लावण्यासाठी या सत्तेचा फायदा करून घ्यायचा असतो. त्यामुळे माइ-यासारखा एक जबाबदार कार्यकर्ता व्यासपीठावरून जबाबदारीने बोलतो त्याचा मेसेज समाजापर्यत जातो. निवडणूकीदरम्यान गावागावांमध्ये संघर्ष निर्माण झालेला असतो, त्या संघर्षाला आपण चिथावणी न देता अशा प्रकारे वक्तव्य केले तर संभाव्य होणा-या गोष्टी शांत होतात. मला माझा मतदारसंघ शांत ठेवायचा आहे. मतदारसंघात कटूता ठेवायची नसल्याचे लंके यांनी स्पष्ट केले.

### त्यांच्याविषयी मी का बोलावे ?

भाजपाच्या व्यासपीठावरून मला मदत झाल्याचे आपण सांगितले होते त्यावर भाजपाच्या निरीक्षक प्रा. मेधा कुलकर्णी नगरमध्ये आल्या त्यावेळी त्यांनी लंके यांनी ते गजा मारणेला का भेटले हे स्पष्ट करावे अशी मागणी केली होती. त्या प्रश्नावर बोलताना लंके म्हणाले, ज्यांनी कधी त्यांच्या राजकीय जीवनामध्ये निवडणूक लढविली नाही, त्यांच्या टीकेला आपण उत्तर द्यायचे नसते. ज्यांना कधी ग्रामपंचायत सदस्य होण्याचेही माहीती नाही अशा लोकांबद्दल मी का बोलायचे ? ज्यांच्याकडे संघटन आहे, जे लोकनियुक्त आहेत अशांनी माइ-यावर टीका केली तर मी उत्तर दिले आहे. मी माझा खुलासाही दिला आहे. उद्या कोणीही उठेल, माध्यमांसमोर येईल, माझ्यावर टीका करेल, मी का खुलासा द्यावा ? असा सवाल लंके यांनी केला.

### विखेंचा सरकारला घरचा आहेर !

देशामध्ये, राज्यामध्ये आजवर अशा प्रकारचे आरोप झाले आहेत. सत्तेत असलेल्या पक्षाचा पराभूत उमेदवार अशी तक्रार करीत असेल तर त्याचा आक्षेप सरकारवरसुध्दा आहे असेच म्हणावे लागेल. त्यांनी भाजपाला घरचाच आहेर दिला आहे. केंद्रीय यंत्रणांवरच आक्षेप घेण्यासारखा हा प्रकार असल्याचे लंके म्हणाले.

### शंकेच्या समाधानासाठी पडताळणी

''जनतेने दिलेला कौल मान्य आहेच. मात्र, अनेक ठिकाणांहून कार्यकर्त्यांच्या शंका आणि तीव्र मागणी होती. त्यामुळे तेथील इव्हीएम-व्हीव्हीपॅट पडताळणी करण्याची मागणी नियमानुसारच निवडणूक आयोगाकडे केली आहे. यात कोणतेही राजकारण नाही. चांगले काम करूनही मते कमी कशी पडली, या शंकेचे समाधान करण्यासाठी ही मागणी केली आहे. यातून कोणीही वेगळा अर्थ काढू नये.''

मा. खा. डॉ. सुजय विखे पाटील

# नितीशकुमारांनी दिलेले ६५ टक्के आरक्षण हायकोर्टाकडून रद्द

## महाराष्ट्र सरकारच्या मनसुब्यांवर पाणी!

मुंबई : प्रतिनिधी

**अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागास प्रवर्ग आणि आर्थिकदृष्ट्या मागास वर्ग अशा विविध प्रवर्गांना ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडून सरकारी नोकरीत दिलेले ६५ टक्के आरक्षण पाटना उच्च न्यायालयाने रद्द करून बिहारच्या नितीश कुमार सरकारला मोठा दणका दिला. मुख्य न्यायमुर्ती के व्ही चंद्रन यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने गौरव कुमार आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या याचिकांवर निर्णय दिला. या निर्णयाचे परिणाम महाराष्ट्रात देखील मोठ्या प्रमाणावर उमटणार आहेत.**

कारण लोकसभा निवडणुकीत मराठा मतांचा इम्पॅक्ट दाखवणारे मनोज जरांगे पाटील पुन्हा आंदोलनाला बसलेले असताना, विधानसभा निवडणुकांच्या तोंडावर डोकेदुखी वाढू नये तसेच लोकसभेप्रमाणे विधानसभेलाही मराठा मते विरोधात जाऊ नये म्हणून एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील राज्य सरकारवर सगेसोयऱ्यांच्या कायद्याच्या अंमलबजावणीचा दबाव आहे. जर जरांगेंच्या मागणीनुसार अंमलबजावणी करावी तर न्यायालयीन स्तरावर ते टिकणार नाही आणि जरांगेंच्या मागणीकडे दुर्लक्ष करावे तर विधानसभेत मराठा मतांचा मोठा फटका बसेल, पर्यायाने लोकसभेप्रमाणे विधानसभेमध्येही महायुतीची पिछेहाट होईल, असे बोलले जात आहे. त्यामुळे विधिमंडळात कायदा करून मराठा समाजाला १० टक्के आरक्षण दिल्याने त्यांची मते आपल्यालाच मिळतील, या महायुतीच्या मनसुब्यांवर पाणी पडण्याची शक्यता आहे.

दुसरीकडे अपवादात्मक परिस्थिती वगळता घटनेने घालून दिलेल्या नियमाप्रमाणे ५० टक्क्यांच्यावरती आरक्षण टिकणार नाही, यावरती पटना उच्च न्यायालयाने शिक्कामोर्तब केल्याने तांत्रिक गोष्ट मराठा समाजाला पर्यायाने मनोज जरांगे यांना सांगून कात्रीत अडकलेली मान सोडविण्याचा प्रयत्न सरकार करू शकते, असेही बोलले जात आहे.




**मनोज जरांगे यांच्या मुख्य मागण्या काय आहेत?**

मराठा समाजाला न्यायालयात टिकणाऱ्या आरक्षणासाठीच्या या आंदोलनातील इतर मागण्यांमध्ये सगेसोयरे अध्यादेशाची अंमलबजावणी करण्याची प्रमुख मागणी आहे. त्याचबरोबर मराठा कुणबी एकच आहेत, हा कायदा पारीत करण्याची त्यांची मागणी आहे.

**पाटना उच्च न्यायालयाचा बिहार सरकारला दणका!**

खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या मागास वर्गासाठी १० टक्के आरक्षण रद्द करणे हे घटनेच्या कलम १४ आणि १५ (६) (ब) चे उल्लंघन आहे, असा युक्तिवाद याचिकाकर्त्यांतर्फे वकील दिनू कुमार केला होता. आरक्षणाचा हा निर्णय सरकारी नोकऱ्यांमध्ये पुरेशा प्रतिनिधित्वाच्या आधारावर नसून जात सर्वेक्षणानंतर जातींच्या प्रमाणाच्या आधारावर घेण्यात आला आहे, असे त्यांनी म्हटले होते. इंदिरा सहानी प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने आरक्षणाच्या मर्यादेवर ५० टक्के निर्बंध घातले होते. जात सर्वेक्षणाचे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात अद्याप प्रलंबित आहे, ज्यामध्ये ५० टक्क्यांवरून ६५ टक्क्यांपर्यंत आरक्षण वाढविण्याच्या राज्य सरकारच्या निर्णयाला आव्हान देण्यात आले आहे. या निर्णयानंतर बिहार सरकारला अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागास प्रवर्ग आणि आर्थिकदृष्ट्या मागास वर्ग अशा विविध प्रवर्गांना शैक्षणिक संस्था आणि सरकारी नोकऱ्यांमध्ये आरक्षण देण्याबाबत नव्याने विचार करावा लागणार आहे.

# सगेसोयऱ्यांना आरक्षण न्यायालयात टिकणार नाही!

## ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांचा दावा

पुणे :प्रतिनिधी

**आम्ही मराठा समाजाच्या बाजूने आहोत. ओबीसींच्या आरक्षणाला धक्का न लावता ते आरक्षण देण्याची आमची भूमिका आहे. मात्र, मनोज जरांगे यांचे समाधान होतच नसेल, तर आता आम्ही काय करणार. सगेसोयरे यांना पण आरक्षण द्या, अशी त्यांची मागणी आहे. मात्र, ते न्यायालयामध्ये टिकणार नाही, असे वक्तव्य राज्याचे ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांनी मंगळवारी पुण्यात केले. माझ्या माहितीप्रमाणे 'सगेसोयरे' अशाप्रकारे आरक्षण देता येत नाही. पण त्यामध्ये काही करता येत असेल, तर सरकार निश्चित प्रयत्न करेल, असेही महाजन यांनी स्पष्ट केले.**



आगामी आषाढी वारी पालखी सोहळ्यानिमित्त 'निर्मलवारी' पूर्वतयारी बैठक विधान भवन येथे पार पडली. त्यानंतर पत्रकारांशी बोलताना ग्रामविकास मंत्री महाजन म्हणाले, 'ओबीसींच्या आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाला आरक्षण देण्याची आमची भूमिका आहे. मराठा आरक्षणाबाबत राज्य सरकारने आजपर्यंत जे काही करायचे होते, त्याबाबत सर्वकाही केले आहे. मराठा समाजाला तत्कालीन मुख्यमंत्रीदेवेंद्र फडणवीसयांनी आरक्षण दिले होते. त्यानंतर तत्कालीन मुख्यमंत्री असलेल्याउद्धव ठाकरेआणि महाविकास आघाडीला ते आरक्षण न्यायालयात टिकवता आले नाही. मराठा आरक्षणाबाबत गेल्या ५० वर्षांत उर्वरीत पान ३ वर

# ''मोदींपेक्षा जास्त मतं आमच्या सुप्रियाला मिळाली''

बारामती : प्रतिनिधी

**बारामतीकरांनी मला १९६७ मध्ये कठीण काळात मला निवडून दिलं. सोमेश्वर कारखान्याचे बाबूलाल काकडे हे माझ्या विरोधात उभे होते. मी कॉलेज जीवन संपवून बाहेर पडलो होतो. बारामतीतल्या तरुणाईने मला कायमच साथ दिली आहे.सुप्रिया सुळेयांची ही चौथी निवडणूक होती. तरीही त्यांना प्रचंड मतांनी बारामतीकरांनी निवडून दिले. बारामतीतल्या जनतेला कुठले बटण दाबायचे ते सांगावे लागत नाही. देशाचे पंतप्रधाननरेंद्र मोदीदीड लाख मतांनी निवडून आले. तर आमच्या सुप्रियाला दीड लाखांहून अधिक मतं मिळाली. देशाच्या पंतप्रधानांपेक्षा आमची सुप्रिया जास्त मतांनी निवडून आली.'' असे शरद पवारांनी म्हटले आहे.**



**आता त्यांच्या वक्तव्यावर भाजपाकडून काही उत्तर दिले जाणार का? हे पाहणं महत्त्वाचे असणार आहे.**

लोकसभा निवडणुकीत बारामती हा सर्वात हाय व्होल्टेज मतदारसंघ ठरला होता. याचे सर्वात महत्त्वाचं कारण होतं ते म्हणजे सुप्रिया सुळे विरुद्ध सुनेत्रा पवार यांचा लढा. नणंद आणि भावजयची ही लढाई खास

## शरद पवारांनी मानले बारामतीकरांचे आभार

करुन शरद पवार विरुद्ध अजित पवार अशी होती. ही लढाई सुप्रिया सुळेंनी जिंकली आहे. बारामती कुणाची तर ती शरद पवारांचीच यावर शिक्कामोर्तब करण्याचं काम लोकसभा निवडणुकीने केलं. शरद पवारांनी ही किमया साधून दाखवली. लोकसभा निवडणुकीचे निकाल ४ जूनला लागले आहेत. निकालाला १६ दिवस उलटूनही त्यानंतर होणारी चर्चा थांबलेली नाही. शरद पवारांनी सुप्रिया सुळेंचं उदाहरण देत त्यांना मोदींपेक्षा जास्त मताधिक्य मिळाल्याचे म्हटले आहे. तसंच शेतकऱ्यांच्या उर्वरीत पान ३ वर

# अमरातीवतीत वाढले आत्महत्याचे प्रमाण

## १५२ दिवसात १४३ शेतकऱ्यांची आत्महत्या



अमरावती : प्रतिनिधी

**गेल्या अनेक वर्षापासून कापूस उत्पादक यवतमाळ जिल्हा हा शेतकरी आत्महत्येसाठी ओळखला जात होता. पण आता यवतमाळहून जास्त अमरावती जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण वाढल्याचे दिसून आले आहे. अमरावतीत मागील १५२ दिवसांत एकूण १४३ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. अमरावतीत कापूस आणि सोयाबिनची लागवड अधिक प्रमाणात होते. पण कधी अवकाळी पावसामुळे तर कधी कडाक्याच्या उन्हामुळे शेतीचे नुकसान होते. अशातच बाजारात कापूस आणि सोयाबिन यांच्या दरातील घसरणीचा फटका शेतकऱ्याला पडतो.**

एनसीआरबीच्या माहितीनुसार, भारतात उर्वरीत पान ३ वर









निरोगी आरोग्याचा कानमंत्र...


# निरामय



# मान्सूनमध्ये घ्या काळजी फिटनेसची!

**मातीचा सुगंध अनुभवत पहिल्या पावसात भिजणं ही एक वेगळीच मजा असते. आता तर पावसाच्या सरींनी चांगलाच जोर धरलाय. या चिंब भिजवणाऱ्या पावसाळ्यात आरोग्यदायी राहण्यासाठीच्या काही टिप्स...**

■ आळस झटका, वर्कआऊट करा : पावसाळ्यात एक प्रकारचा आळस अंगात येतो. हा झटकून टाकण्यासाठी वर्कआऊटला पर्याय नाही. सलग तासभर व्यायाम करणं शक्य होत नसेल तर मग मध्ये थोडा ब्रेक घेऊन पुन्हा वर्कआऊट करावं. पावसामुळे जागोजागी होणारी वाहतूक कोंडीमुळे जिम पर्यंत पोहोचता आलं नाही तरीही घरच्या घरी आवर्जून व्यायाम करावा. स्पॉट जॉगिंग, स्कीपिंग, योगासन नक्कीच करता येऊ शकतात.



■ फळांची रेलचेल : लिची, चेरी, अलुबुखार, पिच ही फळं फक्त पावसाळ्यातच मिळतात. त्याचप्रमाणे काही खास पावसाळी भाज्याही या दिवसात मार्केटमध्ये येतात. भरभरून जीवनसत्त्व असलेल्या या प्रथिनयुक्त मेजवानीचा आस्वाद सर्वांनी अवश्य घ्यायला हवा.



■ गरमागरम पदार्थांवर ताव : गरमागरम सूप, भजी, वडे हे पदार्थ पाऊस पडत असताना खाण्याची गमत वेगळीच असते. या दिवसांत वातावरण थंड असतं आणि म्हणूनच गरम पदार्थ खाणं ही शरीराची गरज असते. असं केल्यानं जंतूसंसर्गामुळे पोट बिघडण्याची शक्यता कमी होते.

■ मसाले करतात कमाल : भारतीय स्वयंपाक आणि मसाले हे एक जुळलेलं समीकरण आहे. पूड करून, भाजून किंवा पेस्ट करून या मसाल्यांचा वेगवेगळ्या पद्धतीनं वापर आपण करतो. खमंग सुवास आणि अपेक्षित चव या मासाल्यांमुळे येते. पचनक्रिया व्यवस्थित पार पाडण्यासाठीही ते आपली खूप मदत करतात. त्यामुळे पावसाळा साजरा करताना थोडं तिखट, झणझणीत, मसालेदार खायला काहीच हरकत नाही.

■ चहाची हुक्की : आपल्याकडे आदरातिथ्याची निशाणी म्हणजे चहा. चहा आपल्या देशात खूप लोकप्रिय आहे. अनेकांच्या दिवसाची सुरुवात चहाशिवाय होतच नाही. बाहेर मुसळधार पाऊस पडत असताना कटिंग चहाचा घेतलेला आस्वाद म्हणजे एक सुख असतं. चहात घातलेलं आलं आरोग्यासाठी चांगलं असतं.

■ चलनवलनाला पर्याय नाही : ऑफिसमध्ये बसून काम करताना किंवा टीव्ही बघताना आपण एकाच जागी खूप वेळ बसतो. दर तासाला उठा आणि थोड्या फेऱ्या मारा. या चलनवलनामुळे रक्ताभिसरणाची प्रक्रिया व्यवस्थित पार पडते.

**न्यूमोनिया हा शब्दच भीतीदायक आहे. त्यातही लहान बाळांना न्यूमोनिया झाला की, त्यांचे आई-बाबा एकदम घाबरून जातात. न्यूमोनिया प्रसंगी चिंताजनक ठरतो हे खरं असलं तरी त्याला प्रतिबंध करणं शक्य आहे आणि उपचारही शक्य आहेत. योग्य काळजी आणि वेळीच सुरू केलेले उपचार हाच न्यूमोनियावरील उपाय असून त्यामुळे या आजारासंबंधी आपल्या मनात असलेली भीती आधी दूर करायला हवी.**



# न्यूमोनियाची भीती घालवूया!

न्यूमोनिया म्हणजे फुफ्फुसांमध्ये झालेला संसर्ग. हा संसर्ग विषाणूजन्य, जीवाणूजन्य किंवा बुरशीजन्य (फंगल) असू शकतो. यातील विषाणूजन्य न्यूमोनिया अधिक प्रमाणात आढळतो. आपल्या फुफ्फुसांत हवेच्या लहान- लहान पिशव्या असतात. न्यूमोनियामध्ये या पिशव्यांमध्ये संसर्ग होऊन सूज येते आणि त्यात कफ जमतो. श्वास घेण्यास त्रास होणं, खोकताना किंवा श्वास घेताना छातीत दुखणं ही न्यूमोनियाची सामान्य लक्षणं आहेत. पाच वर्षांच्या आतील बालकांमध्ये न्यूमोनियापासून संरक्षण मिळवण्यासाठी लसीकरण हा सर्वांत चांगला उपाय आहे. न्यूमोकोक्कल लस तसंच एचआयबी लस (हिमोफिलिस इन्फ्लूएन्झा) लस जीवाणूजन्य न्यूमोनियाचा प्रतिबंध करते, तर विशिष्ट प्रकारच्या विषाणूजन्य न्यूमोनियावर एच १ एन १ लस (स्वाईन फ्लू) घेण्याचा फायदा होतो. न्यूमोकोक्कल व एचआयबी लशी मोठ्या माणसांना- विशेषतः ६५ वर्षांच्यावरील किंवा इतर आजार असलेल्या व्यक्तींनाही जरूर द्याव्यात.



गेल्या काही वर्षांत न्यूमोनिया लसीकरणाबद्दल जनजागृती वाढल्यामुळे न्यूमोनियाचा प्रादुर्भाव कमी होण्यास मदत झाली आहे. म्हणजे न्यूमोनिया ही समस्या खरं तर सोडवण्याजोगी आहे. तरीही जागतिक आरोग्य परिषदेच्या (डब्ल्यूएचओ) माहितीनुसार जागतिक स्तरावर दर वीस सेकंदांना एक बालक या संसर्गानं मृत्यूमुखी पडतं. लसीकरणाबरोबरच पुरेशी स्वच्छता पाळणं आणि बालकांना संसर्गजन्य आजार असलेल्या व्यक्तींपासून दूर ठेवणं आवश्यक आहे. बालकाला वारंवार सर्दी- खोकला किंवा ॲलर्जीचा त्रास होत असेल तर घरात हवा शुद्ध करण्याचं यंत्र (एअर प्युरिफायर) बसवून घेण्याचाही फायदा होईल.

## लहान मुलांची विशेष काळजी

ज्या लहान मुलांना वारंवार सर्दी, खोकला होतो, ताप येतो, त्यांची विशेष काळजी घ्यायला हवी. ताप, सर्दी, खोकला यातून प्रत्येक वेळी न्यूमोनिया होईलच असं मुळीच नाही, परंतु बालकांना वेळीच डॉक्टरांकडे घेऊन जाणं, आजाराचा प्रकार व तीव्रतेची खात्री करून घेणं आणि लवकर उपचार सुरू करणं गरजेचं ठरतं. त्यामुळे सर्दी- तापासारखा साधा आजार बळावून पुढे आजाराचं पर्यवसान न्यूमोनियात होणं टाळता येईल. त्यामुळे बाळाला दिसणाऱ्या लक्षणांमध्ये न्यूमोनियासारखी शंका आढळल्यास लगेच बालरोगतज्ज्ञांचा सल्ला घ्यायला हवा.

## वृद्धांचीही घ्या काळजी

म्हातारपण म्हणजे दुसरे बालपण असे नेहमी म्हणतो. न्यूमोनियाच्या बाबतीत सुद्धा बालकांची जेवढी काळजी घ्यावी लागते, तितकीच वृद्ध आणि इतर आजार असलेल्या व्यक्तींचीही काळजी घेणं आवश्यक ठरतं. ज्या वयस्कर मंडळींना श्वसनमार्गाचा किंवा फुफ्फुसांचा जुनाट आजार असतो (उदा. काळा दमा- क्रॉनिक ऑब्स्ट्रक्टिव्ह पल्मोनरी डिसीज) किंवा मधुमेह, उच्च रक्तदाब असे इतर काही आजार असतात त्यांना श्वसनमार्गाचा संसर्ग झाल्यावर पुढे न्यूमोनिया होण्याची शक्यता अधिक असते. बुरशीजन्य न्यूमोनिया सामान्यतः कमी आढळतो. काही इतर आजारांमध्ये रुग्णांची रोगप्रतिकारशक्ती कमी होते. (उदा. केमोथेरपीवर असलेले रुग्ण किंवा मधुमेही रुग्ण) अशा रुग्णांमध्ये बुरशीजन्य न्यूमोनिया उद्भवण्याची शक्यता असते.





# धूम्रपानाचा मेंदूवर परिणाम

**धूम्रपानामुळे होणाऱ्या मृत्यूंमध्ये भारताचा जगात चौथा क्रमांक आहे, हे गेल्या महिन्यात समोर आलेल्या निष्कर्षातून समोर आलं आहे. धूम्रपानामुळे डोक्यापासून ते पायापर्यंत सर्वत्र परिणाम भोगावे लागतात. जागतिक आरोग्य संस्था (डब्ल्यूएचओ) नुसार धूम्रपान हे जागतिकदृष्ट्या मृत्यूचं टाळता येण्याजोगं कारण आहे. सिगारेट व सिगारेटच्या धुरामध्ये ४,७०० हून अधिक घातक रासायनिक संयुगे असतात, जी सर्वाधिक विषारी असतात. धूम्रपान न करणाऱ्या व्यक्तीच्या तुलनेत वारंवार धूम्रपान करणारी मध्यम वयाची व्यक्ती लवकर मृत्यू पावण्याची शक्यता असते.**

## धूम्रपान आणि मेंदू

सिगारेटमध्ये असलेलं निकोटीन मेंदूवर ताबा मिळवतं; ते मेंदूच्या अशा भागांमध्ये सक्रिय होतं, जे आनंद व समाधानाच्या भावना निर्माण करतात. जेव्हा एखादी व्यक्ती निकोटीनच्या अधीन जाते, तेव्हा त्याला त्यातून बाहेर पडणं खूपच कठीण होऊन जातं. कारण निकोटीनची खूपच सवय लागलेली असते आणि मेंदूला निकोटीनचा पुरवठा झाला नाही, की त्याची तीव्र इच्छा निर्माण होते. यामुळे त्या व्यक्तीची चिडचिड होते, अस्वस्थपणा व तणावात वाढ होते. जास्त प्रमाणात धूम्रपान करण्यानं मेंदू कमजोर होतो व आकुंचन पावतो. त्यामुळे प्रौढ व्यक्तींमध्ये आकलनशक्ती कमी होते आणि हा परिणाम बरीच वर्षे अगदी धूम्रपान करणं सोडून दिलं तरी टिकून राहतो. धूम्रपान करणाऱ्या व्यक्तींमध्ये स्मृतीभ्रंश व अल्झायमर होण्याची उच्च म्हणजेच जवळपास ७९ टक्के संभाव्यता असते. धूम्रपान करणाऱ्या व्यक्तींना वारंवार निद्रानाश व झोपेत श्वसनक्रिया बंद होणं असा अनुभव येतो आणि यामुळे पुढे जाऊन स्मृतीभ्रंश होण्याचा धोका वाढतो. वारंवार धूम्रपान करण्यानं बौद्धिक स्तरावर (आयक्यू) देखील परिणाम होतो. मेंदूला होणारा ऑक्सिजनचा पुरवठा कमी होतो आणि कार्बनडाय ऑक्साईडचं प्रमाण वाढतं, हिमोग्लोबीनवरदेखील परिणाम होतो. दीर्घकाळ धूम्रपान करण्यानं समस्यांचं विश्लेषण करण्याच्या आणि कामाच्या ठिकाणी विविध बाबी हाताळण्याच्या क्षमतेवर परिणाम होतो. सामान्यपणे अशी धारणा असते की, धूम्रपानामुळे लक्ष केंद्रित करणं शक्य होतं, असा केवळ समज आहे; तर याच्या आगदी उलट म्हणजेच धूम्रपानामुळे कार्यक्षमपणे लक्ष केंद्रित करण्याची तुमची क्षमता घटते. मेंदूला ऑक्सिजनचा पुरवठा कमी झाल्यानं वारंवार थकवा जाणवतो.

## धूम्रपान आणि पक्षाघात

### स्टॉप स्मोकिंग

- **एस : (सेट अप अ प्लॅन) योजना करा आणि सकारात्मक दृष्टिकोन ठेवा.**
- **टी : (टॉक) तुमच्या डॉक्टरांसोबत बोला.**
- **ओ : (बी ओपन) तुमच्या भावना व्यक्त करा; तुमचे ध्येय तुमचे कुटुंब, मित्र व सहकाऱ्यांना सांगा.**
- **पी : (पर्सिस्टंन्स) सातत्य ठेवा. प्रयत्न सोडू नका.**

दीर्घकाळ धूम्रपान करणाऱ्या व्यक्तींना पक्षाघात होण्याचा उच्च धोका असतो. रक्तामध्ये निकोटीन असल्यास रक्त घट्ट बनतं. धूम्रपान करण्यानं धमन्या आतून बंद होण्याची शक्यता बळावते. यामुळे मेंदूला रक्ताचा पुरवठा होण्यास अडथळे येतात आणि त्यामुळे ब्रेन स्ट्रोक होण्याची शक्यता बळावते. धूम्रपान न करणाऱ्या व्यक्तींपेक्षा धूम्रपान करणाऱ्या व्यक्तींना निश्चितच अधिक धोका असतो. धूम्रपान न करणाऱ्या व्यक्तींच्या तुलनेत धूम्रपान करणाऱ्या व्यक्तींचा पक्षाघातानं मृत्यू होण्याचा धोका दुप्पट असतो. तथापि, एखाद्या व्यक्तीनं पाच वर्षांच्या आत धूम्रपान करणं थांबवलं, पुरेसा सकस आहार घेतला, तर कधीच धूम्रपान न करणाऱ्या व्यक्तींइतकाच त्यांचा देखील धोका कमी होतो. जरी तुम्ही स्ट्रोकमधून वाचले असाल, तरी त्यातून तुमचं कायमस्वरुपी नुकसान होण्याची शक्यता असतेच.

## धूम्रपान करणं कसं सोडावं?

निकोटीन रिप्लेसमेंट थेरपी : एखाद्यानं धूम्रपान सोडलं आहे, पण निकोटीन घेण्याची तीव्र इच्छा निर्माण होत असली तर च्युइंग गम, पॅचेस, इन्हेलर्स व नॅसल स्प्रे निकोटीनला पर्याय म्हणून वापरता येतात. तणावापासून सुटका म्हणून बऱ्याचदा धूम्रपान केलं जातं. तर अशा बाबतीत निकोटीन किंवा तंबाखूच्या व्यसनातून बाहेर पडण्याकरिता मेडिकेशन (औषधोपचार) प्रभावीपणे परिणाम साधत मदतगार सिद्ध होऊ शकतं.





# तुमचं यकृत फिट आहे का?



यकृत हे शरीरातील चयापचयाचं केंद्र आहे. आपल्या आहारातली कर्बोदकं, प्रथिने व चरबी या सर्व घटकांचं पचन, विघटन, साठवणूक हे सगळे यकृताच्या कार्यावर अवलंबून असतं. रक्तातील हिमोग्लोबिनच्या चयापचय क्रियेत बिलिरुबिन हा घटक तयार होतो. हे बिलिरुबिन विशिष्ट प्रमाणापेक्षा अधिक झाल्यास घातक असून ते शरीराबाहेर टाकण्याचे कार्य यकृत करतं. हे कार्य नीट झालं नाही तर रक्तातील बिलिरुबिनचं प्रमाण वाढते आणि त्यालाच आपण कावीळ असं म्हणतो. यकृतात काही खूप महत्त्वाची प्रथिनं बनवली जातात. रक्तातील अल्ब्युमिन हे त्यातलंच एक प्रथिन आहे. यकृताचे कार्य बिघडल्यावर अल्ब्युमिन कमी होऊ लागतं. तेव्हा शरीरावर सूज येऊ लागते. त्यामुळे अल्ब्युमिन तयार होणं आणि त्याचं कार्य व्यवस्थित चालणं हे अतिशय महत्त्वाचं असतं. आपल्याला कुठेही छोटीशी जखम झाल्यास रक्त वाहू लागतं. पण, थोड्याच वेळात त्या जागी रक्ताची गुठळी (क्लॉट) तयार होऊन रक्त वाहायचं आपोआप थांबतंही. रक्त वाहणं थांबवण्याचं कार्य काही कोॲग्युलेशन फॅक्टर्स करत असतात आणि त्यातील बहुतेक घटक यकृतात तयार होतात. अनेक संप्रेरकांचे (हॉर्मोन्स) चयापचय यकृताच्या चांगल्या आरोग्यावर अवलंबून असतं. तसेच शरीरातील ड जीवनसत्त्व सक्रिय व्हावं यासाठी मूत्रपिंडाबरोबरच यकृताची भूमिका महत्त्वाची असते. शिवाय बी-१२ हे जीवनसत्त्व यकृतात साठवलं जातं. आपण विविध आजारांवर घेत असलेल्या औषधांच्या चयापचय क्रियेतही यकृताचं कार्य महत्त्वाचं ठरतं.

## लॅबोरेटरी तपासण्या का महत्त्वाच्या?

यकृताचा अगदी थोडा भाग काम करत असेल तरी यकृत आपलं काम रेटून नेतं. त्यामुळे यकृताचं झालेलं नुकसान सौम्य प्रमाणात असेल, तर अनेकदा त्याची काहीही लक्षणं दिसत नाहीत. बहुतेक रुग्णांमध्ये जेव्हा आजार अगदी विकोपास जातो तेव्हाच लक्षणं दिसू लागतात. त्यामुळेच यकृताच्या आजारांच्या बाबतीत लॅबोरेटरी तपासण्या फार फायद्याच्या ठरतात. या तपासण्यामुळे आजाराचं निदान वेळेवर होतं.

## यकृताच्या विविध तपासण्या

लिव्हर फंक्शन टेस्ट या लॅबोरेटरी तपासण्या यकृताचं कार्य कसं चाललं आहे ते सूचित करतात. ही कार्ये बिघडली असतील तर त्याचं कारण शोधावं लागतं. यकृताच्या पेशींमध्येच काही कमतरता असेल तर यकृत व्यवस्थित काम करू शकत नाही किंवा पेशी ठिक असूनही बिलिअरी ट्रॅकमध्ये (बाईल डक्ट) दोष असू शकतो. यकृताचा नेमका आजार लॅबोरेटरी तपासणीवरून कळू शकतो. रुग्णाला उपचार लागू पडत आहेत का, आजाराची तीव्रता किती आहे हे जाणून घेता येतं. वेगवेगळ्या आजारांवरील औषधांचा रुग्णाच्या यकृतावर काय परिणाम होतो, हेही लिव्हर फंक्शन टेस्टद्वारे समजू शकतं. यकृताचं प्रत्यारोपण करण्यापूर्वी रुग्णाला काही लॅबोरेटरी तपासण्या कराव्या लागतात. तसंच प्रत्यारोपणानंतर शरीर नव्या यकृताचा स्वीकार कसा करतं हे समजण्यासाठीच्या तपासण्या महत्त्वाच्या आहेत. अवयव प्रत्यारोपणात रुग्णाला इम्यूनोसप्रेसंट औषधं दिली जातात. त्या औषधांचा परिणाम व औषधांची पातळीही लॅबोरेटरी तपासण्या करून कळते.

## तपासण्या कोणत्या?

- बिलिरुबिन तपासणी : बिलिरुबिनचे टोटल बिलिरुबिन, डायरेक्ट बिलिरुबिन आणि इनडायरेक्ट बिलिरुबिन असे तीन प्रकार असतात. इनडायरेक्ट बिलिरुबिनची पातळी अधिक असेल तर ते यकृताच्या पेशींची कमतरता दर्शवते, तर डायरेक्ट बिलिरुबिन वाढलेले असल्यास बिलिअरी पॅसेजमध्ये काहीतरी अडथळा आहे हे सूचित होतं.
- लिव्हर एन्झाईम टेस्ट : एसजीपीटी (म्हणजेच एएलटी तपासणी) आणि एसजीओटी (म्हणजे एएसटी तपासणी) या दोन लिव्हर एन्झाईम तपासण्यांमधून यकृताच्या पेशींचं झालेलं नुकसान कळतं.
- सिरम प्रोटिन तपासण्या : यात अल्ब्युमिन व ग्लोब्यूलिन या दोन घटकांचं रक्तातील प्रमाण तपासलं जातं.
- कोॲग्यूलेशन फॅक्टर्स : यात प्रोथ्रॉंबिन टाईम ही तपासणी करतात. यकृताच्या आजारांमध्ये कोॲग्यूलेशन फॅक्टर्स नीट तयार होत नसतील तर जखम झाल्यावर रक्त वाहणे थांबण्यास वेळ लागतो. अर्थात प्रोथ्रॉंबिन टाईम वाढतो. यकृताचा तीव्र आजार वा लिव्हर फेल्युअरच्या रुग्णांमध्ये अमोनिया तपासणी करून आजाराची तीव्रता जाणून घेतली जाते.
- इन्फेक्टिव्ह हेपॅटायटिस मार्कर्स : यातून हिपॅटायटिस ए, हिपॅटायटिस बी, हिपॅटायटिस सी आणि हिपॅटायटिस ई यापैकी आजार जाणून घेतलं जातं.

## शॉर्ट न्यूज

### विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

■ **नगर :** प्रयास व नम्रता दादी-नानी ग्रुपच्या वतीने सावेडी, वैदुवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. ग्रुपच्या सदस्या माया राजहंस व लता डेंगळे यांनी पुढाकार घेऊन मुलांसाठी शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून दिले. नगरसेवक मनोज दुल्लम व माजी नगरसेविका सोनाबाई तायगा शिंदे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले.

### पुणतांबा-राहाता थेट बससेवा सुरू करा

■ **पुणतांबा :** परिसरातील ग्रामस्थ, विद्यार्थी व ज्येष्ठ नागरिक ह्यांच्या सोयीसाठी पुणतांबा ते राहाता तसेच पुणतांबा शिर्डी अशी थेट बससेवा तातडीने सुरू करावी, अशी मागणी मनसेचे राहाता तालुका अध्यक्ष गणेश जाधव यांनी केली आहे. आमदार, आमदार मंत्री, खासदार यांच्याकडे पाठपुरावा करूनही हे प्रश्न प्रलंबित असून हे प्रश्न मार्गी लावण्यासाठी मनसेच्यावतीने धडक आंदोलन करण्याचा इशाराही जाधव दिला आहे.

### शिंदे यांचा यारी ग्रुपच्या वतीने सत्कार

■ **राहुरी :** पोलीस स्टेशन येथे कार्यरत असलेले सहाय्यक पोलीस निरीक्षक देवेंद्र सुर्यकांत शिंदे यांना पोलीस निरीक्षक पदी पदोन्नती मिळाली. मूळचे धुळे जिल्ह्यातील शिंदखेडा तालुक्यातील निमगुळ येथील एका शेतकरी कुटुंबात जन्मलेले देवेंद्र सूर्यकांत शिंदे यांनी खडतर परिश्रम घेऊन आपले शिक्षण पूर्ण केले. गेल्या १४ वर्षांपासून शिंदे पोलीस दलात सेवा देत आहेत. देवेंद्र सुर्यकांत शिंदे यांची पदोन्नती झाल्या बद्दल राहुरी शहरातील यारी ग्रुपच्या वतीने त्यांचा फेटा बांधून व पुष्पगुच्छ देऊन यथोचित सत्कार करण्यात आला.

### उघड्या रोहित्रांमुळे नागरिकांचा जीव टांगणीला

■ **नेवासा :** महावितरण विद्युत कंपनीच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या अक्षम्य दुर्लक्षामुळे भर पावसाळ्यात सर्वसामान्य नागरीकांच्या जीवावर खेळ बेतला जाण्याची दाट शक्यता निर्माण झालेली असून महावितरण कंपनीचे अधिकारी व कर्मचारी नेमके तरी करतात काय? असा संतप्त सवाल जनतेतून निर्माण झालेला आहे. नेवासा फाटा आणि परिसरात गेल्या अनेक ठिकाणी जीवघेण्या विजेच्या तारा खाली आलेल्या असून गाळ्यासमोर गेल्या अनेक वर्षांपुर्वी बसविलेल्या जुनाट विद्युत खांबाची उंची अत्यंत कमी झालेली असल्यामुळे दुर्घटना घडण्याची शक्यता निर्माण झालेली आहे.

### शेतकऱ्यांना शरद कार्ले यांचे आवाहन

■ **जामखेड :** अलिकडील काळातील पावसाच्या लहरीपणामुळे शेतकऱ्यांचे कधी नुकसान होईल हे सांगता येत नाही. यामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना झालेल्या नुकसानीतून दिलासा मिळावा यासाठी शासनाच्या वतीने विम्याचा लाभ दिला जातो. त्यानुसारच याही वर्षी शेतकऱ्यांना १ रूपयात पिक विमा देण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. मात्र त्याही पुढे जाऊन जामखेड येथील कृषी उत्पन्न बाजार समितीने तालुक्यात शेतकऱ्यांसाठी एकही रूपया न घेता जामखेड येथील बाजार समिती कार्यालयात मोफत पिकविमा भरून देण्याची व्यवस्था केली.

# कोल्हे यांचा वचननामा शिक्षिकांसाठी आशादायी

■ मिना नरवडे-चव्हाण यांच्याकडून वचननाम्याचे कौतुक
■ शिक्षकांची संकल्पपूर्ती करणारा विवेकनामा

**नाशिक : प्रतिनिधी**



**नाशिक शिक्षक मतदारसंघाच्या निवडणूकीमध्ये उतरलेले युवा उमेदवार विवेक बिपिनदादा कोल्हे यांनी त्यांच्या वचनाम्यामध्ये मांडलेली भूमिका महिला शिक्षिकांसाठी आशादायी असल्याची प्रतिक्रीया मिना नरवडे-चव्हाण यांनी उत्स्फुतपणे दिली.**

यासंदर्भात आपली भूमिका मांडताना मिना नरवडे-चव्हाण यांनी सांगितले की, या निवडणूकीमध्ये उतरल्यानंतर विवेक कोल्हे यांनी आपला वचननामा प्रसिध्द केला असून त्यात महिलांसाठी प्राधान्याने आदाराचे स्थान देण्यात आले यात आम्हा महिला शिक्षिकांचे समाधान आहे. शिक्षकांच्या सर्व प्रलंबित मागण्यांचा विचार कोल्हे यांच्या वचननाम्यात करण्यात आला असून हा वचननामा धोरणात्मक असल्याचे नरवडे-चव्हाण यांनी सांगितले.

### स्व. शंकरराव कोल्हेंचे वारसदार

**सहकार क्षेत्रात भरीव योगदान देतानाच राज्यामध्येही आपले कर्तुत्व सिध्द करणारे स्व. शंकरराव कोल्हे यांच्या कार्याचा वारसा विवेक कोल्हे पुढे चालवत आहेत. शैक्षणिक क्षेत्रातील त्यांचे योगदान महत्वपुर्ण आहे. त्यांनी या निवडणूकीच्या निमित्ताने प्रसिध्द केलेला वचननामा सर्वव्यापक, सर्वसमावेशक असा आहे. पुरूषांबरोबरच त्यात महिलांनाही प्राधान्याने स्थान दिलेले आहे. महिला शिक्षकांचे प्रश्न प्राधन्याने सोडविण्यासाठी त्यांनी दिलेली ग्वाही अश्वासक आहे.**

**मीना नरवडे- चव्हाण**

### प्रलंबित मागण्यांसाठी कोल्हे मैदानात

**नरवडे-चव्हाण पुढे म्हणाल्य शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या अनेक महत्वपुर्ण मागण्या बऱ्याच दिवसांपासून शासनदरबारी प्रलंबित आहेत. या मागण्यांचा पाहिजे त्या प्रमाणात विद्यमान लोकप्रतिनिधींकडून पाठपुरावा झाल्याचे दिसून येत नाही. विना अनुदानित शाळांचे अनुदान, शिक्षकांना वारंवार देण्यात येणारी अशैक्षणिक कामे, जुनी पेन्शन योजना, कमी पटसंख्येमुळे तुकडी बंदचा निर्णय असे प्रश्न प्रलंबित आहेत. हेच प्रश्न मार्गी लावण्यासाठी विवेक कोल्हे हे या निवडणूकीच्या रिंगणात उतरले आहेत असे नरवडे- चव्हाण यांनी सांगितले.**

### महिला शिक्षकांच्या मागण्यांची दखल कौतुकास्पद

**एका युवकाने महिला शिक्षकांच्या मागण्यांची दखल घेऊन त्या प्रश्नांना दिलेले प्राधान्य खरोखर कौतुकास्पद आहे. शैक्षणिक क्षेत्रात महिला शिक्षिक या मोलाची भुमिका बजावत असतात. त्यांचे अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. विवेक कोल्हे यांनी जाहिर केलेल्या वचननाम्यात महिलांचे प्रश्न सोडविण्याची ग्वाही दिल्याने महिला शिक्षकांना दिलासा मिळणार असल्याचा विश्वास मीना नरवडे- चव्हाण यांनी व्यक्त केला.**

# यंत्र अभियांत्रिकी शिक्षण काळाची गरज



**भारतातील** सर्वात प्रगत राज्यात सुरु असलेले उद्योग धंदे व आगामी काळात झपाट्याने बदल होवू शकणारे वाहननिर्मिती क्षेत्र यांना सद्य स्थितीला सर्वात जास्त कमतरता जाणवती ती म्हणजे कुशल मनुष्यबळाची अर्थात पदविका यंत्र अभियंत्यांची. ही उद्योगांची गरज लक्षात घेता यंत्र अभियांत्रिकी पदविका शिक्षण ही काळाची गरज ठरणार आहे यात तिळमात्र शंका नाही. हा अभ्यासक्रम कसा पूर्ण करता येईल याबाबत विद्यार्थी व पालकांच्या मनामध्ये वेग वेगळे प्रश्न निर्माण झाले असतीलच त्या सर्वांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न आपण आज या लेखामधून करणार आहोत.

**अभ्यासक्रम कुठे पूर्ण करता येईल ?**

महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडाळाशी संलग्न असलेल्या कोणत्याही तंत्रनिकेतन मध्ये.

कालावधी :- ०३ वर्ष,शै. पात्रता : १० वी पास

अभ्यासक्रम पूर्ण केल्यास नोकरीच्या संधी.

महाराष्ट्र राज्य परिवहन विभागात - सहाय्यक मोटार वाहन निरिक्षक,भारतीय रेल्वे- कनिष्ठ अभियंता,महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ - कार्यशाळा अधिक्षक,कनिष्ठ अभियंतानामांकित शासकिय कंपन्यांमध्ये तसेच प्रत्येक खाजगी कारखान्यांमध्ये कनिष्ठ अभियंता म्हणून महाराष्ट्रासह संपूर्ण भारतभर नोकरीच्या विविध संधी उपलब्ध असतात. या व्यतिरिक्त विद्यार्थी विविध प्रकारचे लघुउद्योग देखील सुरु करु शकतात.

हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यास उच्च शिक्षण घेता येते का?

हो, हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर पदवी अभ्यासक्रमा- च्या थेट द्वितीय वर्षामध्ये देखील प्रवेश घेता येतो व अभियांत्रिकी शाखेची पदवी मिळविता येते.

**प्रवेश अर्ज कसा करता कराल?**

आपल्या सर्वांच्या सोयीसाठी तंत्रशिक्षण संचालनालयाने विविध तंत्रनिकेतनांमध्ये प्रवेश सुविधा केंद्र सुरु केले आहेत. त्यांना प्रत्येक भेट देवून आपण आपला प्रवेश अर्ज ऑनलाईन पद्धतीने करू शकतो किंवा इच्छूक विद्यार्थी तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर भेट देवून ऑनलाईन पद्धतीने देखील आपला प्रवेश अर्ज करू शकतात.

प्रवेश प्रक्रियेची शेवटची तारीख : २५ जुलै २०२४ (यात बदल होवू शकतो)

**प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रे**

१० वी चे गुणपत्रक,शाळा सोडल्याचा दाखला, वय, राष्ट्रीयत्व व अधिवास प्रमाणपत्र, उत्पन्नाचा दाखला (मा. तहसिलदार साहेब यांनी दिलेला), आधार कार्ड, तीन रंगीत फोटो, जातीचा दाखला (खुला प्रवर्ग सोडून), नॉन क्रिमिलियर प्रमाणपत्र ( एससी, एसटी व खुला प्रवर्ग सोडून)(विद्यार्थ्याचे राष्ट्रीयकृत बँकेत खाते असेल तर उत्तम नसेल तर लवकरात लवकर उघडावे)

**प्रवर्गानुसार सर्व शासकीय शिष्यवृत्ती साठी विद्यार्थी पात्र असता**

चला तर विद्यार्थी मित्रांनो वाट कसली पाहताय? पुढील तीन वर्षांत स्वतःच्या पायावर उभे रहायचे असेल तर आजच आपला प्रवेश यंत्र अभियांत्रिकी पदविकेचा निश्चित करा आणि उज्वल भवितव्यासाठी सज्ज व्हा !

■ **इंजि.प्रा.देविराज आबूज**

## (पान १ वरून) सगेसोयऱ्यांना आरक्षण न्यायालयात टिकणार नाही!

कोणी प्रयत्न केले का?शरद पवारयांनी मराठा समाजाला आरक्षण देण्याची गरजच काय, असे विधान केले होते. आता प्रत्येकजण स्वत:ची राजकीय पोळी भाजण्याचा प्रयत्न करत आहे. '

**'जरांगेंचे समाधान होतच नाही'**

ओबीसींच्या आरक्षणाला धक्का न लावता राज्य सरकारने दहा टक्के आरक्षण दिले आहे. मात्र मनोज जरांगे यांचे समाधान होतच नसेल, तर आता आम्ही काय करणार. सगेसोयरे यांना पण आरक्षण द्या, अशी त्यांची मागणी आहे. मात्र, ते न्यायालयामध्ये टिकणार नाही. माझ्या माहितीप्रमाणे 'सगेसोयरे' अशाप्रकारे आरक्षण देता येत नाही. तरीदेखील त्यामध्ये कायद्याच्या चौकटीत राहून काही करता येत असेल, तर सरकार निश्चित प्रयत्न करेल, असेही महाजन यांनी या वेळी सांगितले.

### "मोदींपेक्षा जास्त मतं आमच्या सुप्रियाला मिळाली"

प्रश्नांवरुन त्यांनी सरकारवर टीका केली आहे.

**शरद पवार काय म्हणाले?**

"मोदी सरकारवर आणि भाजपावर लोकांचा विश्वास राहिलेला नाही. मोदी सरकारमधले लोक म्हणतात की आम्ही खाणाऱ्यांचा विचार करतो. पण पिकवणाऱ्याने जर पिकवलं नाही तर खाणारा काय खाणार? असा प्रश्न शरद पवारांनी विचारला. तसेच शेतकरी अडचणीत कसा येईल? याचा विचार मोदींकडून केला जातो" असंहीशरद पवारम्हणाले.

**मराठा ओबीसी प्रश्नात केंद्राने हस्तक्षेप करावा**

मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगेंचे आंदोलन सुरु आहे, तर ओबीसींसाठी लक्ष्मण हाके लढा देत आहेत. याबाबत विचारले असता "या प्रश्नात आता केंद्र सरकारने हस्तक्षेप करायची गरज आहे. दोन्ही मुद्दे निकालात काढले गेले पाहिजेत. सामाजिक ऐक्याला बाधा पोहचणार नाही याची काळजी घेऊन हा प्रश्न सोडवला पाहिजे. केंद्र सरकारला या प्रश्नांमध्ये फक्त बघ्याची भूमिका घेऊन चालणार नाही" असेही शरद पवारांनी सुनावले आहे.

### अमरातीवतीत वाढले आत्महत्याचे प्रमाण

प्रत्येकी एका तासाला एक शेतकरी आत्महत्या करतो.

यवतमाळहून अधिक अमरावती जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या संख्येत वाढ झाली आहे. यवतमाळमध्ये या वर्षी (मे महिन्यापर्यंत) १३२ शेतकऱ्यांनी आपले जीवन संपवले आहे. त्यामुळे शेतकरी आत्महत्येच्या बाबतीत यवतमाळ दुसऱ्या क्रमांकावर आहे. शासनाकडून अनेक योजना शेतकऱ्यांसाठी राबवल्या जातात पण तरी शेतकरी आत्महत्येच्या प्रमाणात अद्याप घट झालेली दिसून येत नाही. महाराष्ट्रात शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या संख्येत वाढ २०२३ मध्ये एकूण २,८५१ शेतकऱ्यांनी आत्महत्या केली. तर २०२२ मध्ये २,९४२ आणि २०२१ मध्ये २,७४३ शेतकऱ्यांनी आत्महत्या केली. २०२३ मध्ये सर्वात जास्त आत्महत्या विदर्भ आणि मराठवाड्यातील शेतकऱ्यांनी केल्या आहेत. विदर्भात एकूण १,४३९ तर मराठवाड्यात एकूण १,०८८ शेतकऱ्यांनी आत्महत्या केली. राज्य सरकारने, २००१ पासून विदर्भातील ६ जिल्ह्यांतील शेतकरी आत्महत्येची आकडेवारी ठेवली आहे. यात अमरावती, अकोला, यवतमाळ, वाशिम आणि बुलढाणा यांचा समावेश आहे. या जिल्ह्यात २२ हजारांहून अधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या केली आहे.

वसंतराव नाईक शेतकरी स्वावलंबन मिशनचे माजी अध्यक्ष आणि शेतकरी कार्यकर्ते किशोर तिवारी म्हणाले की, अमरावतीत शेतकऱ्यांची परिस्थिती खूप वाईट आहे. शेतकरी सोयाबिनच्या लागवडीकडे वळले. पण मागील वर्षी सोयाबिनच्या दरात क्विंटल ४ हजार रुपयांनी घसरण झाली. काही शेतकरी पिक लागवडीसाठी सावकारांकडून किंवा बँकांकडून कर्ज घेतात पण त्यांना कर्जवसूली वेळेस मानसिक त्रासाला सामोरे जावे लागते.









# सलून चालकाच्या मुलाला २५ लाखांची फेलोशिप!

## खा. नीलेश लंके यांच्याकडून सन्मान

**सुपा : प्रतिनिधी**

**कान्हूरपठार येथील सलून चालक विनायक कुटे यांचा मुलगा निखिल यास मिझोराम येथील एनआयटीमध्ये भौतिकशास्त्र या विषयत पीएचडी करण्यासाठी २५ लाख रूपयांची फेलोशिप मंजुर झाली आहे. निखिल याच्या या यशामुळे त्याच्या आई वडीलांना आकाश ठेंगणे झाले आहे. निखिल याने मिळविलेल्या या बहुमाना बद्दल खासदार नीलेश लंके यांनी त्याचा विशेष सन्मान करीत शुभेच्छा दिल्या.**



■ मिझारोम येथे पीएचडी करण्यासाठी २५ लाख रूपयांची फेलोशिप मिळविणाऱ्या निखिल कुटे याचा खा. नीलेश लंके यांनी सत्कार केला.

खा. लंके यांनी केलेल्या सत्काराप्रसंगी बाळासाहेब भुजबळ, शामकांत जाधव, भाउ बिडे, शाम साळुंके, सुनील आतकर, सुखदेव राऊत, ज्ञानेश्वर कोरडे, अमोल काळे, गणेश शिंदे, प्रसाद भोसले, विनायक कुटे, संजय वाकचौरे, प्रसाद कोरडे, कानिफनाथ गायकवाडद्ध संदीप भोसले, अक्षय काळे, राहुल कवडे, महादेव काळे, विनोद काळे, दिपक शिंदे, संतोष काळे, भागा आतकर, निखिल कुटे, संतोष गायकवाड उपस्थित होते.

कान्हूरपठार येथील जनता विद्यालयात बारावीर्यंत शिक्षण पुर्ण करताना निखिल हा वडीलांसोबत सलुनमध्ये काम करून त्यांना हातभार लावत असे. महाविद्यालयीन शिक्षण घेतानाही तो नियमितपणे वडीलांसोबत सलुनमध्ये जात असे. पुढे भौतिकशास्त्र विषयात एम एससी पुर्ण करून प्राध्यापक म्हणून नोकरी केली. आता भौतिक साहित्यिक विज्ञान या विषयावरील पीएचडीसाठी निखिलची निवड झाली आहे.

### तीन विद्यार्थ्यांमध्ये निखिलची निवड

**मिझोराममध्ये पीएचडी करण्यासाठी देशातील ४ हजार ५०० विद्यार्थ्यांपैकी केवळ तीघा विद्यार्थ्यांची निवड झाली असून त्या निखिलचा समावेश आहे. त्याची निवड भारतात दुसऱ्या तर महाराष्ट्रात पहिल्या क्रमांकाची आहे. त्यास पालकांबरोबरच पारनेर महाविद्यालयाच्या प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभले.**

### इस्त्रोमध्ये काम करण्याचे स्वप्न

**इयत्ता ११ वी मध्ये प्रवेश घेतला आणि त्याच वेळी भौतिकशास्त्र विषयात करीअर करण्याचा निर्णय घेतला होता. लॉकडाउनमध्ये मी घरी दुर्बिण तयार केली. चंद्र, मंगळ पाहण्याची तीची क्षमता आहे. शिक्षण घेत असताना अनेक प्रश्नमंजुषा जिंकल्या. इस्त्रो सारख्या संशोधन क्षेत्रात काम करण्याचे स्वप्न आहे**

निखिल कुटे

# प्रतिकूल परिस्थितीतही प्राथमिक शिक्षकांचे कार्य प्रेरणादायी : खासदार नीलेश लंके

**वडनेर बुद्रुक, निघोज : प्रतिनिधी**

**शिक्षण क्षेत्रामध्ये मुख्याध्यापक बाळासाहेब फटांगडे, मुख्याध्यापक अशोक वाबळे, मुख्याध्यापक राजेंद्र शितोळे यांनी अविरतपणे ३६ वर्षे सेवा करून अनेक विद्यार्थी घडविण्याचे काम केले त्यामुळे या सर्वांचे शिक्षण क्षेत्रातील योगदान मोलाचे असून प्रतिकूल परिस्थितीतही प्राथमिक शिक्षकांचे कार्य प्रेरणादायी आहे असे गौरवोद्गार खा.निलेश लंके यांनी दुर्गा लॉन्स वाडेगव्हाण ता. पारनेर येथे आयोजित सेवापूर्ती समारंभामध्ये काढले.**



दुर्गा लॉन्स मंगल कार्यालयामध्ये मुख्याध्यापक बाळासाहेब फटांगडे,मुख्याध्यापक अशोक वाबळे,मुख्याध्यापक राजेंद्र शितोळे यांच्या सेवानिवृत्ती निमित्ताने सेवापूर्ती समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिक्षक नेते बापूसाहेब तांबे हे होते.

यावेळी व्यासपीठावर सेवानिवृत्त मुख्याध्यापक ज्ञानदेव लंके गुरुजी, शिक्षण निरीक्षक (माध्यमिक शिक्षण) श्रीराम थोरात,महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाचे राज्य संपर्कप्रमुख गोकुळ कळमकर,शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष बबनदादा गाडेकर, गुरुमाऊली सदिच्छा मंडळाचे जिल्हाध्यक्ष सुरेश निवडुंगे,अहमदनगर जिल्हा प्राथमिक शिक्षक बँकेचे चेअरमन रामेश्वर चोपडे,शिक्षक नेते आबासाहेब दळवी,शिक्षक बँकेचे संचालक कारभारी बाबर, सूर्यकांत काळे,महेश भनभणे, जिल्हा शिक्षक संघाचे सरचिटणीस प्रकाश नांगरे, शिक्षण विस्तार अधिकारी गोवर्धन ठुबे, भाऊसाहेब साठे, भाऊसाहेब काळे,अहमदनगर जिल्हा विकास मंडळाचे मा. सचिव व विद्यमान विश्वस्त संतोष मगर,जुनी पेन्शन हक्क संघटनेचे नेते राजेंद्र ठोकळ,सचिन नाबगे, गुरुदेव शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष संतोष मगर, शिक्षक संघ नगर तालुका अध्यक्ष गहिनीनाथ पिंपळे यांच्यासह आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना खासदार नीलेश लंके म्हणाले की, मातृभाषेतून दिलेल्या शिक्षणाने मुलांचा चांगला विकास होतो. जिल्हा परिषद शाळांमधून दिले जाणारे शिक्षण हे मातृभाषेतून मिळते त्यामुळे येथे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो. स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळवलेले अनेक अधिकारी हे जिल्हा परिषद शाळेतून शिक्षण घेतलेले आहेत. त्यामुळे जिल्हा परिषदेच्या शाळा ह्या गुणवत्ता पूर्व शिक्षण देणाऱ्या शाळा मानल्या जातात. जिल्हा परिषदेच्या शाळांनी आज लोकसहभागातून विविध उपक्रम राबविले जातात ही खूप कौतुकास्पद बाब आहे. सेवानिवृत्त होत असलेल्या तीनही मुख्याध्यापकांनी त्यांच्या सेवाकालात अनेक विद्यार्थी घडविले त्यांचे विद्यार्थी आज विविध पदावर काम करत आहेत आज या कार्यक्रमाच्या निमित्ताने अनेक विद्यार्थी या ठिकाणी उपस्थित असून आपल्या गुरूप्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी या कार्यक्रमासाठी आवर्जून उपस्थित आहे हीच या शिक्षकांची आयुष्यभर केलेल्या कामाची मोठी पावती व मोठा सन्मान मानतो फटांगडे, वाबळे, शितोळे यांनी केलेल्या कामाचा आदर्श इतरांनी घ्यावा असेही ते यावेळी म्हणाले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष शिक्षक नेते बापूसाहेब तांबे यांनीही या तिन्ही शिक्षकांनी केलेल्या शिक्षण क्षेत्रातील दिलेल्या भरीव योगदानाबद्दल गौरवोद्गार काढून त्यांच्या भावी निरोगी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. खासदार निलेशजी लंके व उपस्थित सर्व मान्यवरांच्या हस्ते सेवानिवृत्त होणाऱ्या मुख्याध्यापक बाळासाहेब फटांगडे,मुख्याध्यापक अशोकराव वाबळे,मुख्याध्यापक राजेंद्र शितोळे यांचा सन्मान करण्यात आला.या कार्यक्रमाचे निमित्ताने माध्यमिक शिक्षण विभागाचे शिक्षण निरीक्षक श्रीराम थोरात शिक्षक संघाचे राज्य संपर्कप्रमुख गोकुळजी कळमकर, जिल्हाध्यक्ष बबनदादा गाडेकर, विस्तार अधिकारी गोवर्धन ठुबे, मा. प्राचार्य रामचंद्र सुपेकर,भाऊसाहेब डेरे यांच्यासह आदींनी यावेळी मनोगते व्यक्त केली. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शिक्षक संघाचे जिल्हा सरचिटणीस प्रकाश नांगरे शिक्षक संघाचे दक्षिण जिल्हा प्रमुख गौतम साळवे संघाचे तालुकाध्यक्ष चंद्रकांत गट, गुरुमाऊली सदिच्छा मंडळाचे तालुकाध्यक्ष संदीप ठाणगे, रवींद्र रोकडे चंद्रकांत मोढवे,अनिल इकडे,दादाभाऊ कोल्हे,सतीश परांडे,अश्फाक शेख,गणेश कोहकडे,परशुराम ठोंबरे, राजू आत्तार,अशोक कळमकर, रमेश रोहकले,गणेश भोसले, सचिन परांडे यांच्यासह आदींनी विशेष परिश्रम घेतले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रसिद्ध निवेदक आणि कवी संजय ओहोळ प्रास्ताविक शिक्षक नेते आबासाहेब दळवी व आभार तालुकाध्यक्ष चंद्रकांत गट यांनी मानले.

# खासदार नीलेश लंके यांचा उद्या निघोजला येथे सत्कार

## कपिलेश्वर मंगल कार्यालयात आयोजन

**निघोज : प्रतिनिधी**



**लोकसभा निवडणुकीत नगर दक्षिण लोकसभा मतदारसंघात निवडणूक येऊन राज्यात नावलौकिक मिळवलेल्या खासदार नीलेश लंके यांचा सत्कार सोहळा निघोज येथील कपिलेश्वर मंगल कार्यालयात शुक्रवार दि.२१ रोजी सायंकाळी ग्रामस्थ व विविध संस्था यांच्या वतीने करण्यात येणार असून यावेळी निघोज - अळकुटी जिल्हा परिषद गटातील खासदार लंके प्रेमी जनता मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत . या कार्यक्रमाचे नियोजन बाबासाहेब कवाद निघोज नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष व मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे उपाध्यक्ष वसंत कवाद यांच्या नेतृत्वाखाली नुकतेच करण्यात आले आहे. माहिती आपली माती आपली माणसं या सामाजिक संस्थेचे अध्यक्ष तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेतृत्व रुपेश ढवण तसेच लोकनेते नीलेश लंके प्रतिष्ठानचे प्रवक्ते विकास शेटे यांनी दिली आहे.**

खासदार लंके यांना जिल्हा परिषद गटात सव्वा दहा हजार मताधिक्य मिळाले असून फक्त निघोज गावाने त्यांना तीन हजाराचे मताधिक्य मिळाले आहे . तालुक्यात मोठ्या प्रमाणात विकासकामे करताना लंके यांनी निघोज गटाला सर्वाधिक प्राधान्य दिले आहेत . लंके हे निघोजचे आहेत ही भावना ग्रामस्थांची आहे तसेच राज्याचे जागृत देवस्थान असलेल्या मळगंगा देवीवर लंके यांची मनोभावे श्रद्धा आहे. गेली पावणेपाच वर्षं आमदार असताना लंके व त्यांच्या कुटुंबीयातील सर्व सदस्यांनी निघोजकरांच्या सुखा दुखात मोठ्या प्रमाणात सहभागी होऊन सहभाग नोंदविला आहे. शुक्रवार दि. २१ रोजीचा हा खासदार लंके यांचा सत्कार सोहळा हा तालुक्यातील पहिलाच सत्कार सोहळा असून हा सोहळा अद्वितीय करण्याचा निघोज ग्रामस्थांचा संकल्प आहे मात्र खासदार लंके हे बुके किंवा पुष्पगुच्छ तसेच हार स्विकारणार नाहीत त्यापेक्षा जनतेने सत्कार साहित्य म्हणून वह्या आणाव्यात जेणेकरून याचा उपयोग गरीब विद्यार्थ्यांना होऊन शालेय साहित्य म्हणून वह्यांचे वाटप करण्यासाठी होईल विधानसभा सदस्य असताना सुद्धा लंके यांची सत्कार स्विकारण्याची हीच पद्धत होती यामुळे गेली पावणेपाच वर्षात हजारो गोरगरीब गरजू विद्यार्थ्यांना याचा लाभ मिळाला आहे.

**शुक्रवार दि.२१ रोजी सायंकाळी सहा वाजता एस टी बस स्थानक परिसरात खासदार लंके यांचे आगमन त्यानंतर राज्याचे जागृत देवस्थान असलेल्या मळगंगा देवीचे दर्शन त्यानंतर मंदीराजवळ असलेल्या कन्हैया ज्वेलर्स बिल्डिंगमधील राज्य मराठी पत्रकार संघाच्या पारनेर तालुका विभागीय कार्यालयाचे उद्घाटन होणार असून त्यानंतर मिरवणूकीने ग्रामपंचायत चौक,बाजारतळ ते कपिलेश्वर मंगल कार्यालय अशी भव्य दिव्य मिरवणूक निघणार आहे.**

या सत्कार सोहळ्यास जनतेने मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन विविध संस्थांचे पदाधिकारी व ग्रामस्थ यांनी केले आहे.

# दुधाचे अनुदान कधी मिळणार?

## दुध उत्पादक शेतकरी अनुदानाच्या प्रतिक्षेत

**गाडीलगांव : प्रतिनिधी**



**गायीच्या दुधाच्या दरात गेल्या सात आठ महिन्यांपासून घसरण सुरू असून शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहे. दुधाचे भाव कोसळल्याने शेतकऱ्यांनी अनुदान जाहिर केले असले तरी अद्याप ७० टक्के दुध उत्पादकांना अनुदान प्राप्त झाले नाही. दुध उत्पादक शेतकरी अनुदानाच्या प्रतिक्षेत असून हे अनुदान कधी मिळणार असा सवाल शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे.**

शेतमाल तसेच कांद्यालाही भाव नसल्याने शेतकरी वर्ग मोठया प्रमाणावर दुध उत्पादनाकडे वळाला असून दुधाचे दरही कोसळल्याने शेतक-यांच्या पदरी निराशा पडली आहे. जानेवारी महिन्यात सरकारने दुधाला अनुदान देण्याची घोषणा केली. प्रत्यक्षात ७० टक्के शेतक-यांच्या खात्यावर अनुदानाची रक्कमच जमा झालेली नाही. हे अनुदान ज्यांना अनुदान मिळाले ते केवळ एक किंवा दोन हप्तेच आले आहेत.

एकीकडे दुधाचे दर कोसळलेले असताना दुसरीकडे पशुखाद्याचे दर मात्र वाढल्याने शेतकरी अधिकच आर्थिक गर्तेत सापडला आहे. शेतीपुरक व्यवसायाकडे शेतकरी वळाल्याने त्यांच्या संख्येत तसेच जनावरांच्या संख्येतही भर पडत आहे. अशातच पशुखाद्याचे दर वाढल्याने शेतकऱ्यांच्या उत्पादनात घट झाली आहे. त्यासाठी शासनाने दुधाच्या दराबाबत लवकरात लवकर निर्णय घेऊन आर्थिक गर्तेत सापडलेल्या शेतकरी वर्गाला दिलासा देण्याची आग्रही मागणी करण्यात येत आहे.

### तरूण दुग्ध उत्पादक निराशेच्या गर्तेत

**पावसाळयाच्या दिवसांत दुध उत्पादनात घट होत आहे. अनेक भागात चारा टंचाई निर्माण झालेली आहे. दुधाच्या २६ रूपये प्रतिलिटरचा विचार केला तर चारा, पशुखाद्याच्या तुलनेत हिशेब बसत नाही. त्यामुळे दुग्धव्यवसायाकडे वळालेल्या तरूण पिढीला निराशेच्या गर्तेत लोटले आहे.**

सुरेश गाडीलकर
दुध उत्पादक शेतकरी
दुधगंगा उद्योग समुह

# पारुबाई शिरोळेंचे संस्कार यांचे कुटुंबीय समाजाभिमुख

## रामायणाचार्य मनोहर महाराज सिनारे

**निघोज : प्रतिनिधी**

**आदर्श माता कशी असावी हे पारनेर तालुक्यातील पाडळी दर्या येथील पारुबाई शंकर शिरोळे यांचे उदाहरण सर्वश्रुत असून मातोश्रीने धार्मिक व सामाजिक संस्कार केल्यानेच शंकर शिरोळे यांचे कुटुंबीय समाजाभिमुख असल्याचे प्रतिपादन रामायणाचार्य मनोहर महाराज सिनारे यांनी व्यक्त केले आहे.**



मातोश्री शिरोळे यांच्या प्रथम पुण्यस्मरण कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी अशोक शिरोळे, दत्तात्रय शिरोळे, प्रकाश शिरोळे, मनिषा शिवाजी उंडे आदी तसेच शिरोळे कुटुंबीय नातेवाईक मित्र परिवार आप्तेष्ट यांनी मातोश्री शिरोळे यांच्या प्रतिमेचे पूजन करीत अभिवादन करण्यात आले. यावेळी जी एस महानगर बँकेचे संचालक व सेवानिवृत्त कार्यकारी संचालक बी जे खोसे, बाजार समितीचे संचालक आण्णा पाटील बढे, पाडळी दर्याचे सरपंच रामदास खोसे, बाजार समितीचे संचालक नवनाथ खोसे, माजी चेअरमन हरिभाऊ चौधरी सर, माजी चेअरमन नामदेव खोसे, आपली माती आपली माणसं या सामाजिक संस्थेचे अध्यक्ष रूपेश ढवण, बलभीम कुबडे, एकनाथ औटी, विलास गोरडे, जमालभाई शेख, ईश्वर महाराज थोरात, सुदाम शिंदे, कोतकर सर, पारनेर तालुका पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष दत्ताजी उनवणे आदी तसेच विविध संस्थांचे पदाधिकारी व ग्रामस्थ यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### आई वडीलांची सेवा ईश्वर सेवा

**शिरोळे कुटुंबाने आई वडील सेवा हीच ईश्वर सेवा मानून आजपर्यंत कार्यरत राहिले आहे. शिरोळे बंधूंनी सेवाभाव करताना शंकर दादा शिरोळे यांच्या मार्गदर्शनाखाली चांगले काम केले असून आज मातोश्री पुण्यस्मरण निमित्ताने जी गर्दी झाली हे त्याच सेवेचे प्रतिक असल्याचे गौरवोद्गार ईश्वर महाराज थोरात यांनी व्यक्त केले आहे.**

सिनारे महाराज यावेळी म्हणाले कै. पारुबाई शंकर शिरोळे यांनी धार्मिक व सामाजिक कामांच्या माध्यमातून शिरोळे कुटुंबावर संस्कार केले तेच संस्कार आजपर्यंत आणी अनेक पिढ्यांना पुरणार आहेत. पैशापेक्षा संस्कार महत्त्वाचे आहेत. शंकर दादा शिरोळे यांनी एस टी परिवहन मंडळात नोकरी करीत असताना मुले अशोक, दत्तात्रय,प्रकाश,मनिषा यांना शिकवून समाजात कुटुंबाचा स्तर अग्रगण्य राहील अशाप्रकारे सामाजिक मुल्ये देत मोठे केले. जी एस महानगर बँक तसेच नामांकित कंपनीत कार्यरत राहून त्यांनी सुद्धा कुटुंबाचे नाव मोठे केले अशाप्रकारे धार्मिक व सामाजिक संस्कार मोठे असल्याचे प्रतिपादन सिनारे महाराज यांनी व्यक्त केले आहे.

# माजी विद्यार्थ्यांच्या भेटीने शिक्षकांना ऊर्जा मिळते

## स्नेहमेळाव्याच्या माध्यमातून तब्बल १७ वर्षानंतर भरला वर्ग



**सुपा : प्रतिनिधी**

**संतांना पंढरपूर भेटीतून विठ्ठलाच्या दर्शनाने जो आनंद प्राप्त होतो तसाच आनंद आम्हा शिक्षकांना स्नेहमेळाव्याच्या माध्यमातून माजी विद्यार्थ्यांना भेटून होत असतो व कर्तृत्ववान विद्यार्थ्यांच्या भेटीने शिक्षकांना ऊर्जा मिळते असे प्रतिपादन माजी प्राचार्य धनाजी खरमाटे यांनी स्नेहमेळाव्यात माजी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना केले.**

श्रीगोंदा तालुक्यातील देवदैठण येथील विद्याधाम कला कनिष्ठ महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा कार्यक्रमाचे अध्यक्षीय मनोगतातून ते बोलत होते . यावेळी बोलताना ते म्हणाले की माजी विद्यार्थ्यांचे स्नेह मेळाव्याचे आयोजन करणे हे विद्यार्थी व शिक्षकांसाठी गरजेचे आहे . सेवानिवृत्तीनंतर पुन्हा प्रौढ अवस्थेत असलेल्या कर्तृत्ववान विद्यार्थ्यांना भेटून आनंद होतो.

महाविद्यालयाच्या २००७ च्या बॅचमधील इयत्ता अकरावी बारावीच्या विद्यार्थ्यांनी तब्बल १७ वर्षानंतर आपल्या शाळेत एकत्र येत गुरुजनांच्या समवेत स्नेह मेळाव्याचे आयोजन केले होते.

यावेळी या विद्यार्थ्यांना शिकवणारे संदीप घावटे , प्रा. नंदकुमार पाटील , लक्ष्मण आयरे व एम . पी . बनकर हे शिक्षक उपस्थित होते . या सर्वांनी उपस्थित विद्यार्थ्यांशी आपल्या मनोगतातून हितगूज साधत मोलाचे मार्गदर्शन केले . अनेक वर्षानंतर एकत्र येण्याचा योग विद्यार्थी व शिक्षकांसाठी घडवून आणल्याबद्दल विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

१७ वर्षाच्या भेटीनंतर सर्व विद्यार्थी - विद्यार्थीनी शालेय जीवनातील आठवणींना गप्पांच्या माध्यमातून उजाळा देत होते . सध्या काय चाललय ? काय करता ? याची आपुलकीने विचारपूस केली जात होती.

सर्व विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून स्वत:ची ओळख करून देताना कौटुंबिक माहिती सांगितली तसेच शालेय जीवनातील आठवणींना उजाळा दिला.व सर्वांनी पुन्हा एकदा स्नेह मेळाव्याच्या माध्यमातून एकत्र येण्याचा निर्धार केला.
यावेळी गणेश वाघ याने मनोगत व्यक्त करताना अनेक कविता सादर केल्या . तसेच सारंग दंडवते ,मनिषा शिंदे , महेश टकले , निलम कोरके यांनी आपल्या मनोगतातून मित्रांशी संवाद साधताना जुन्या आठवणींना उजाळा दिला.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गणेश वाघ , रमेश भवर, अक्षय कौठाळे, सारंग दंडवते, मनिषा खेडकर, मनिषा शिंदे यांनी विशेष प्रयत्न केले. सारंग दंडवते यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचालन केले.

# सुपा, नगरमध्ये विशेष आर्थिक क्षेत्राची निर्मिती करा

## प्रसाद खामकर यांचे क्षेत्रीय विकास आयुक्तांना निवेदन

**पारनेर, सुपा : प्रतिनिधी**

**ओबीसी घटकांचे नेते प्रसाद खामकर यांनी महाराष्ट्र आणि गोवा या विशेष आर्थिक क्षेत्राचे एसईझेड वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाचे क्षेत्रीय विकास आयुक्त ज्ञानेश्वर पाटील, संयुक्त आयुक्त सी पी सी चौहानय, उपविकास आयुक्त प्रसाद वरवंडकर यांची भेट देउन सुपा आणि नगरमध्ये विशेष आर्थिक क्षेत्राची निर्मिती करण्याची मागणी करत तसे निवेदन सादर केले.**

पारनेर आणि नगर येथील मुळ रहिवासी असलेले तरूण आणि तरूणी अभियांत्रीकी, व्यवस्थापन, माहिती तंत्रज्ञान, वाणिज्य अभ्यासक्रमांसाठी तसेच याच क्षेत्रात रोजगाराच्या निमित्त पुणे, बगळूरू, मुंबईसह देशातील शहरांमध्ये कायमस्वरूपी स्तलांतरीत झाले आहे. मागिल १० ते १५ वर्षात स्थलांतरीत झालेल्या तरूणांनी संख्या आज जवळपास एक लाखांवर आहे. अशा तरूणांना रोजगाराची पुरक उपलब्धता सुपा आणि नगर येथील एमआयडीसीमध्ये नाही. सुपा आणि नगर येथील औद्योगिक वसाहतींमध्ये मॅन्युफॅक्चरिंग, फार्मास्युटिकल्स, ऑटोमोबाईल, माहिती आणि तंत्रज्ञान आणि आभूषण तयार करणाऱ्या अशा वेगवेगळया सेगमेंटमधील कंपन्या आणण्याचा प्रयत्न झाला पाहिजे अशी मागणी खामकर यांनी या निवेदनात केली आहे.

आयटी क्षेत्रामध्ये पदव्या असणाऱ्या मुला-मुलींची शहरातील संख्या मोठी असल्याने ते इतर शहरांमधील तसेच परदेशातील कंपन्यांवर अवलंबून आहेत. त्यासाठी सुपा आणि नगर शहरालगत विशेष आर्थिक क्षेत्राची एसईझेड उभारणी करून तरूणांना रोजगार उपलब्ध करून देता येईल.
यावेळी मा. वरीष्ठ पोलीस अधिकारी बन्सी बारवकर व उद्योजक सुयोग बारवकर हे उपस्थित होते.



■ ओबीसी नेते प्रसाद खामकर यांनी सुपा आणि नगरमध्ये विशेष आर्थिक क्षेत्राची निर्मिती करण्याची मागणी करत तसे निवेदन सादर केले.

### काय आहे एसईझेड?

**विशेष आर्थिक क्षेत्र अर्थात एसईझेडमध्ये व्यवसाय आणि व्यापार कायदे देशाच्या इतर भागांसाठी वेगळे आहेत. हे क्षेत्र देशाच्या राष्ट्रीय सीमांमध्ये स्थित आहेत. व्यापार संतुलन, रोजगार, वाढीव गुंतवणूक, प्रभावी प्रशासन याचा त्यात समावेश आहे. या झोनमध्ये उद्योजकांना आकर्षित करण्यासाठभ् आर्थिक धोरणे आखली जातात. त्यात सामान्यतः गुंतवणूक, कर आकारणी, व्यापार, कोटा, सीमाशुल्क आणि कामगार नियमांचा समावेश असतो.**

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com